


UNITE FOR GOOD

# अजिंठा

नोव्हेंबर- २०२५ ● अंक- ५ वा

|  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|
| आर.आय.प्रेसिडेंट<br>रो.फ्रान्सिस्को अरेझ्झो | डिस्ट्रीक्ट गव्हर्नर<br>रो.ज्ञानेश्वर शेवाळे | प्रेसीडेंट<br>रो.गिरीश कुलकर्णी | ऑन.सेक्रेटरी<br>रो.सुभाष अमळनेरकर | बुले.कमिटी चेअरमन<br>रो.कॅ.मोहन कुलकर्णी |

Rotary | UNITE FOR GOOD
ROTARY CLUB JALGAON
R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

अजिंठ्याच्या या नोव्हेंबर च्या अंकात आपले सर्वांचे मन:पूर्वक स्वागत. या अंकात आपणांस मागील महिन्याच्या आपल्या साप्ताहिक सभा व आपण घेतलेले प्रोजेक्टस् यांची माहिती मिळेल. त्याचप्रमाणे आपली नेहमीची सदरे उगवते तारे, बुक रिव्हयु, बॉलीवूड टाईम्स् वगैरे सुद्धा आपणांस वाचायला मिळतील. नोव्हेंबर महिना हा 'फाउंडेशन महिना' म्हणून साजरा केला जातो. त्यासाठी या अंकात पीडीजी रो.श्रीकांत इंदाणी, दोंडाईचा यांचा लेख आपणांस नक्कीच आवडेल. दि. १५ ऑक्टोबर ला भारतरत्न डॉ.ए.पी.जी.अब्दुल कलाम यांचा वाढदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. आपल्या क्लबने सुद्धा हा दिवस एका अभिनव पद्धतीने साजरा केला त्याची माहिती आणि छायाचित्रे आपणांस नक्कीच आनंद देऊन जातील. दीपावली निमित्त दि. २४ ऑक्टोबर च्या आपल्या साप्ताहिक सभेत स्नेहमिलन हा आगळावेगळा सोहळा आयोजित करून फेलोशिपचा एक वेगळाच आनंद सर्वांनी घेतला. यात शहरातील इतर रोटरी क्लबचे पदाधिकारी व जळगावचे लोकप्रिय आमदार मा.श्री.राजूमामा उर्फ श्री.सुरेश भोळे हेही उपस्थित होते. मित्रांनो, आपण सर्व एकत्र येऊन रोटरीच्या माध्यमातून जी मानवतावादी सेवा समाजात प्रदान करीत असतो, त्याला तोड नाही. शिक्षण, आरोग्य, गरिबी निर्मुलन आदी क्षेत्रांमध्ये रोटरी कार्य करीत असते आणि त्यात आपला क्लबही अग्रेसर राहून कार्यरत असतो, हे आपणा सर्वांना अभिमानास्पद आहे. असेच महान कार्य आपण सर्व यापुढेही सदैव करीत राहू असे या निमित्ताने खात्रीपूर्वक सांगावेसे वाटते. आणि हो हा अंक आपणांस कसा वाटला, त्याबद्दल नक्की प्रतिक्रिया द्या. धन्यवाद !

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

रोटरी ही केवळ एक संस्था नाही, तर ती सेवेची, मैत्रीची आणि परस्परांतील घट्ट ऋणानुबंधांचे एक सशक्त व्यासपीठ आहे. रोटरी आपल्याला समाजासाठी काहीतरी देण्याची संधी देते, आणि त्याच वेळी आपल्याला अंतःकरणी समाधान व आनंदाची अनुभूती मिळवून देते. या सेवेतून मिळणारा मानसिक आनंदच रोटरीचे खरे वैशिष्ट्य आहे. आपण जे काही समाजाकडून घेतो, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे भारतीय संस्कृतीचे मूळ तत्त्व आहे आणि रोटरी त्याच विचाराची जाणीव सतत करून देते.

नोव्हेंबर हा महिना रोटरीत "Foundation Month" म्हणून साजरा केला जातो. हा महिना म्हणजे सामाजिक बांधिलकी, कृतज्ञता आणि उदारतेचा महिना. जगभरातील रोटेरियन विविध सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कार्यरत आहेत, आणि त्यांना आवश्यक आर्थिक बळ रोटरी फाऊंडेशनमार्फत मिळते. पोलिओ निर्मूलनासारख्या जागतिक मोहिमांपासून ते शिक्षण, आरोग्य, पाणी, पर्यावरण आणि शांततेसाठी चालणाऱ्या प्रकल्पांपर्यंत फाऊंडेशनची भूमिका अतुलनीय आहे. आपला क्लब १००% रोटरी फाऊंडेशनसाठी योगदान देणारा क्लब व्हावा, ही आपली सामूहिक आकांक्षा आहे. प्रत्येक सदस्याने आपल्या क्षमतेनुसार योगदान देऊन या उद्दिष्टपूर्तीस हातभार लावावा, ही मनापासून अपेक्षा आहे.

ऑक्टोबर महिन्यात आपण रोटरी महावाचन अभियानासह अनेक नियोजित उपक्रम यशस्वीरीत्या राबविले. सदस्यांचा उत्साही सहभाग आणि टीमवर्क हे आपल्या यशाचे गमक ठरले. आता नोव्हेंबर महिन्यात आपण रिल स्पर्धा, Book Review Competition, (डिस्ट्रिक्ट पातळीवर), CPR Workshop, रोटरॅक्ट क्लब स्थापना, टिफिन रेसिपी स्पर्धा, धानोरा येथे भव्य वैद्यकीय तपासणी शिबीर, तसेच रोटरी बॉक्स क्रिकेट यांसारखे विविध उपक्रम राबविणार आहोत.

सोबतच आपल्या Interact District Conference– ज्ञानसंकल्प या मोठ्या कार्यक्रमाची तयारी सुरू आहे. हा उपक्रम ९ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून, जिल्हाभरातील इंटरॅक्टर्ससाठी प्रेरणादायी ठरेल. या कार्यक्रमाच्या यशासाठी आपण सर्वांनी तन, मन आणि धनाने सक्रिय सहकार्य द्यावे, अशी विनंती आहे.

या सर्व प्रयत्नांचा केंद्रबिंदू एकच सेवा, सौहार्द आणि संघभावना. चला तर मग, या वर्षीच्या आपल्या संदेशाला कृतीत उतरवू ..! Unite for Good... and enjoy the joy of giving!

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

## ऑक्टोबर महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ दि. ३ ऑक्टोबर –** 'शोध मन:शांतीचा....एक संवाद' या विषयावर आपल्या क्लब तर्फे शहरातील विविध क्षेत्रातील विविध मान्यवर व्यक्ती यांचे त्यांनी आपापले मानसिक ताण कसे हाताळले व त्यावर काय उपाय योजिले याबद्दल सविस्तर सांगितले. या सभेत जळगावचे जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, ज्येष्ठ पत्रकार श्री.हेमंत अलोने, रो.डॉ.मिलिंद वायकोळे, जनता बँकेच्या मॅनेजर सौ.स्वाती भावसार व जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक अधिकारी सौ.अर्चना मोरे यांनी आपले अनुभव कथन केले.

**✻ दि. १०  ऑक्टोबर –** रोजी या सभेत 'कोजागिरी' साजरी करण्यासाठी श्री.किरण सोहळे प्रस्तुत 'हे सुरांनो चंद्र व्हा' हा मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. अतिशय सुश्राव्य संगीताने बहरलेल्या या कार्यक्रमाचा आस्वाद क्लब च्या सर्वच सभासदांनी घेतला. यावेळी सदस्यांची उपस्थिती लक्षणीय होती.







**✻ दि. १७ ऑक्टोबर –** ही सभा बिझिनेस मिटींग म्हणून आयोजित केली होती. यात इन्टरॅक्ट क्लबची कॉन्फरन्स तसेच शालेय विद्यार्थ्यांकडून मोठ्या संख्येने देशभक्तीपर गीते म्हणून घेणे या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांवर चर्चा करण्यात आली.

## साप्ताहिक सभा

# ऑक्टोबर महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ दि. २४ ऑक्टोबर –** या सभेत 'दीपावली' निमित्त स्नेहमिलन हा विषय होता. यात आपल्या क्लबच्या सौ.विशाखा पोतदार, सौ.किर्ती पाटील व सौ.आदिती कुलकर्णी यांनी 'दीवाळी' वरील गीते सादर केली. सुरुवातीस रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी यांनी बासरीवर गणेश वंदना सादर केली. या सभेत जळगावच्या इतर क्लबचे अध्यक्ष, सचिव व इतर डिस्ट्रीक्ट ऑफीसर यांनाही आमंत्रित केले होते. त्यांनी ही आपापली मनोगते सादर केली. नंतर दिवाळी निमित्त सर्वांनी फटाक्यांची आतिषबाजी करून दिवाळी साजरी केली. कार्यक्रमास आ.राजूमामा भोळे ही उपस्थित होते.





**✻ दि. ३१ ऑक्टोबर –** या दिवशी रोटरी क्लब जळगाव सेंट्रल बरोबर जॉईन्ट मिटींग घेण्यात आली. पद्मश्री श्री.चैत्राम पवार यांची प्रकट मुलाखत रो.गिरीश कुलकर्णी यांनी घेतली. बारीपाड्यापासून तर ते पार भारत देशा पर्यंत त्यांनी केलेल्या बदलांमुळे समाज प्रगती कशी झाली ते अतिशय सुंदर पद्धतीने त्यांनी कथन केले. दोन्ही क्लबच्या सदस्यांची उपस्थिती उत्साहजनक होती.



## प्रोजेक्ट

# ऑक्टोबर महिन्यातील प्रोजेक्ट



**※ दि. ३ ऑक्टोबर –** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी CPR Awarness Programme सोसायटी ऑफ ॲनेस्थेशिआलॉजिस्ट यांच्या मदतीने आयोजित करण्यात आला. डॉ.लिना पाटील, डॉ.जयश्री राणे, डॉ.सुनिल सुर्यवंशी व डॉ.संभव सुर्यवंशी यांनी विद्यार्थी व कॉलेज स्टाफ यांना मार्गदर्शन केले. रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.हेमंत बाविस्कर, रो.ॲड.हेमंत भंगाळे व इतर अनेक रोटेरियन्स उपस्थित होते.

**※ दि. ९ व २६ ऑक्टोबर–** वाचन कट्टा– आंबेडकर नगर, धानोरा येथील मुला–मुलींनी विविध विषयांच्या पुस्तकांचे वाचन केले. दि.२६ ऑक्टोबर रोजी गणपती नगर येथील रोटरी हॉल मध्ये वाचन कट्टा संपन्न झाला. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.प्रेम कोगटा, सचिव पंकज व्यवहारे, रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी, रो.संदीप शर्मा, रो.राकेश चव्हाण, रो.नितीन काळुंखे, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी व रो.ॲन.सौ .आदिती कुलकर्णी या उपस्थितांनी वाचन केले.






**※दि.१५ ऑक्टोबर–** १५ ऑक्टोबर हा भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन तो वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी आपल्या रोटरी हॉल ला साधारण ५०० अभ्यागतांनी हॉल वर येऊन आपल्या आवडीचे पुस्तकाचे कमीत कमी १० मिनिटे ते अर्धा तास वाचन केले. काही वाचकांनी ऑनलाईन वाचन करून त्याचा व्हिडीओ पाठवला. या उपक्रमास मा.जिल्हाधिकारी जळगाव मा.श्री.रोहन घुगे यांनी सुद्धा प्रत्यक्ष येऊन १५ मिनिटे वाचन केले. या दिवशी सकाळी ९ ते संध्या. ६ या वेळेत एकूण १५ हजार मिनिटांचे वाचन केले गेले.

**※ दि.१८ ऑक्टोबर–** या दिवशी दिवाळी निमित्त रेल्वे स्टेशन वरील हमाल व पांजरापोळ येथील एकूण ६० मजूर यांना फराळ व मिठाईचे वाटप करण्यात आले. या प्रोजेक्टचे संपूर्ण प्रायोजकत्व रो.कवरलाल संघवी यांनी स्विकारले. या वेळी रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, रो.कवरलाल संघवी व इतर अनेक सदस्य या प्रोजेक्टसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## प्रोजेक्ट

# ऑक्टोबर महिन्यातील प्रोजेक्ट




**✻दि.१९ ऑक्टोबर–** एम.आय.डी.सी. येथील रो.राकेश चव्हाण यांच्या फॅक्टरी शेजारील खुल्या भूखंडात यावेळी १५० झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण समितीचे अध्यक्ष रो.राकेश चव्हाण, अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर व इतर अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.

**✻ दि. २१ ऑक्टोबर–** रोटरी क्लब जळगाव व आर.सी.सी. धानोरा यांच्या मार्गदर्शनाखाली धानोरा विद्यालयातील इंटरॅक्ट क्लबच्या सदस्यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ आकाश कंदील बनवले व ते आदिवासी पाड्यांवर व तांड्यांवर जाऊन तेथील आदिवासींना वाटप केले व घरावर लावून दिले. अतिशय आनंदीत झाल्याने तेथील महिलांना गहिवरून आले होते व त्यांनी रोटरी क्लब जळगाव व इंटरॅक्ट क्लब धानोरा यांचे मन:पूर्वक आभार मानले.



**✻ प्रोजेक्ट–** रोटरी क्लब जळगाव यांच्या सामाजिक बांधिलकीतून ‘संकल्प – चांगला माणूस बनण्याचा’ या पुस्तकाचे वाटप विविध शाळेतील विद्यार्थ्यांना गेल्या दोन महिने अव्याहतपणे चालू आहे. आतापर्यंत १७००० पुस्तके वाटली आहेत. ऑक्टोबर महिन्यात खालील शाळांना ही पुस्तके वाटण्यात आली.

✻ दि.२/१०– मानव सेवा विद्यालय, ✻ दि.३/१०– मानव सेवा विद्यालय, ✻ ४/१० – ब.गो.शानबाग विद्यालय
✻ दि.६/१०– शारदा माध्य. विद्यालय, ✻ दि.८/१०– प.न.लुंकड विद्यालय, ✻ १०/१० – राज माध्यमिक विद्यालय
✻ दि. ११/१० – स्वा.सै.पं.ध.थेपडे विद्यालय





रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ-
# रोटरी फाऊंडेशन : सेवा का अमर प्रतीक

पी.डी.जी.रो. श्रीकांत इंदानी



रोटरी फाउंडेशन मानवता के उस उज्ज्वल दीपक की तरह है, जो न केवल अंधकार मिटाता है बल्कि आशा की नई किरणें भी जगाता है। यह संस्था उन अनगिनत दिलों की धड़कन है, जो दुनिया को बेहतर बनाने के लिए समर्पित हैं। स्वयं से ऊपर सेवा  यह केवल एक नारा नहीं, बल्कि रोटरी फाउंडेशन की आत्मा है।

**जो बाँट दे खुशियाँ, वही असली दौलतमंद है, जो मिटाए ग़म किसी का, वही जीवन धन्य है।**

दुनिया के हर कोने में, जहाँ पीड़ा है, जहाँ गरीबी है, जहाँ शिक्षा की कमी या स्वास्थ्य की चिंता है, वहाँ रोटरी के स्वयंसेवक मानवता का हाथ थामे खड़े मिलते हैं। पोलियो निमुर्लन से लेकर स्वच्छ पेयजल, शिक्षा, शांति और आपदा राहत तक रोटरी फाउंडेशन ने हर क्षेत्र में अपनी निस्वार्थ सेवा से करोड़ों जीवन बदले हैं। You will find number of  foundation supported life changing stories.

**दीए जलाते रहो, भले आँधियाँ चलें, इंसानियत की राह में कदम सँभालते चलें।**

यह फाउंडेशन केवल आर्थिक सहायता नहीं देता, बल्कि हर व्यक्ति में देने की खुशी का संस्कार जगाता है। रोटरी के प्रत्येक सदस्य का योगदान इस फाउंडेशन की नींव को और मजबूत बनाता है। उनके प्रयासों से अनगिनत बच्चों को शिक्षा मिली है, असहायों को आश्रय मिला है और बीमारों को जीवन का नया अवसर मिला है।

**किसी की आँख में आँसू न रहने दो, यही तो है सेवा  खुद को और खुद को पाने का रास्ता।**

रोटरी फाउंडेशन हमें यह सिखाता है कि सच्ची खुशी दूसरों की मुस्कान में है। यह मानवता के उस सेतु की तरह है जो संस्कृतियों, सीमाओं और भाषाओं को जोड़ता है। यह केवल एक संस्था नहीं, बल्कि एक भावना है– सेवा, प्रेम और शांति की भावना।

**मजहब नहीं सिखाता आपस में बैर रखना, रोटरी बताता है सेवा ही है ईश्वर की पूजा।**

रोटरी फाउंडेशन, वास्तव में, उस विश्वास का नाम है, कि जब हम सब मिलकर दें, तो दुनिया एक बेहतर स्थान बन सकती है।

At the end I just wanted to conclude Rotary foundation teaches us. Why, when and Where to give? After COVID God saved us with purpose. Support and donate to Rotary Foundation.

***Rtn. Shrikant Indani-*** *A hardcore Rotarian with a Rotaractor's heart, Rtn. Shrikant Indani has been an integral part of the Rotary family for the past 28 years. Having served in almost every position, he led with distinction as Club President in 2013–14, District Rotaract Representative (DRR), and District Governor in 2022–23.*


*A passionate advocate for* ***The Rotary Foundation (TRF)****, he has successfully mobilized contributions exceeding* ***one million dollars****, with his assigned district achieving a record-breaking* ***two million dollars*** *under his leadership. Along with his wife,* ***Rtn. Sarika Indani****, he is a* ***Major Donor****, while their children,* ***Aditi and Aditya****, are proud* ***Paul Harris Fellows (PHF)****.*

*Currently serving his* ***second consecutive term as Assistant Regional Rotary Foundation Coordinator (ARRFC)*** *for Zone 4, Rtn. Shrikant continues to inspire with his dedication, leadership, and unwavering commitment to Rotary's ideals of Service Above Self.*

## उगवते तारे

# माझ्या स्टार कन्या

रो.ॲन.विशाखा पोतदार



सृष्टी माझी मोठी मुलगी. खेळात आणि अभ्यासात अतिशय हुशार. बॅडमिंटन ती स्टेट लेव्हलला खेळली आहे पण सोबतच ती स्विमिंग मध्येही चॅम्पीयन आहे. क्रिकेट खो–खो ची ही ती आपल्या टीमची कॅप्टन होती. आपल्या क्लब च्या बॉक्स क्रिकेट मध्ये तिचा खेळ सर्वांनी पाहिलाच आहे.संगीतातही तिला चांगली गती आहे. हुशार, पण तितकीच तिच्या मनाचं करणारी.

तिचे १२ वी पर्यंतचे शिक्षण सेंट टेरेसा हायस्कूल मध्ये झाले. १० वी ला तिला ९४.००%आणि १२वीला ९१.००% मार्क्स होते. पुढचे बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण मिठीबाई कॉलेज मुंबईतून केले. सी.ए. फाऊंडेशन आणि फर्स्ट ग्रुप पास करून सुद्धा हट्टी स्वभावामुळे सी.ए. अर्धवट सोडून सी.एफ.ए. पूर्ण केले. नुकतेच तिने Queen Mery College London येथून M.S. (Finance) पूर्ण केले आहे.

कुठेच नोकरी करणार नाही हे तिचे पहिल्या पासूनच ठरलेले. सध्या ती एखाद्या Start up वर काम करत आहे. सोबतच शेअर मार्केट मध्ये तिने स्वतःचे काही ॲपस् बनविले आहेत त्या प्रमाणे ती काम करत आहे.

सृष्टी मितभाषी जरी असली तरी Leadership हा गुण तिच्या कडे आहे. त्यामुळे आपल्या सर्कल मध्ये ती सर्वांना प्रिय आहे. अभ्यास आणि स्पोर्ट्स सोबतच तिला अवांतर वाचन आणि अध्यात्मिक वाचनाचीही गोडी आहे. परमहंस योगानंद , सदगुरू यांची अध्यात्मा वरची पुस्तके तिने वाचली आहेत. त्याच्यावर आमची चर्चा होत असते . सखोल वाचनामुळे ती आपली गोष्ट नीटपणे मांडत असते पटवून देत असते. तसेच तिचा स्वभाव निडर आणि स्पष्टवक्ताआहे.तिची बाजू खरी असल्यास ती निर्भीड पणे वागते.आणि हीच गोष्ट ती इतरांपेक्षा वेगळी असल्याचे दर्शविते.

तिच्याच पावलावर पाऊल टाकून माझी छोटी मुलगी ऋतू ही सुद्धा CFA पूर्ण करत आहे. ऋतू ही अभ्यासात सृष्टी प्रमाणेच हुशार असून तिचे १२ वी पर्यंतचे शिक्षण हे सेंट टेरेसा हायस्कूल मधूनच झालेले आहे.तिला सुद्धा १० वी ला ९४%आणि १२वीला ९०% मार्क्स होते. वयाच्या २१ व्या वर्षीच तिला मुंबई मधेच चांगल्या कंपनीत नोकरी लागली ही तर देवाची कृपा झाली असे मी म्हणेन ऋतुला पण संगीताची आवड आहे . गिटार, पियानो तिला छान वाजवता येते.

ऋतू स्वभावाने अत्यंत नम्र, पण आत्मविश्वासू आहे. ती मेहनती, प्रामाणिक आणि मन लावून काम करणारी आहे. तिचा प्रत्येक निर्णय विचारपूर्वक असतो आणि ती नेहमी स्वतःला उत्तम बनवण्याचा प्रयत्न करते. तिला संगीताचीही खूप आवड आहे गिटार आणि पियानो वादनात ती पारंगत असून, संगीत तिच्यासाठी केवळ छंद नाही तर मन:शांतीचा एक सुंदर मार्ग आहे.
तिचं हास्य गोड, स्वभाव मनमिळाऊ आणि वागणं नेहमी सभ्य. घरातले वातावरण हलके फुलके ठेवणं, सर्वांना प्रोत्साहन देणं, आणि सकारात्मकता पसरवणं हे तिचं वैशिष्ट्य आहे. तिच्यात सृजनशीलता आणि आत्मविश्वासाचा सुंदर संगम आहे.

आई म्हणून मला माझ्या दोन्ही मुलींचा सृष्टी आणि ऋतूचा अत्यंत अभिमान आहे. अर्थात त्यांचे बाबांनी त्यांना दिलेले स्वातंत्र्य आणि पाठींबा याचा त्यांच्या यशात मोलाचा वाटा आहे हे मी नमूद करते. त्यांनी स्वतःच्या कष्टाने, शिस्तीने आणि योग्य मूल्यांनी आजपर्यंत जे काही साध्य केलं आहे, ते कोणत्याही आईसाठी अभिमानास्पद व गौरवास्पद आहे. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंद, यश आणि समाधानाने भरलेला राहो. त्या दोघींची स्वप्नं पूर्ण व्हावीत, आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने नवी उंची गाठावी हीच माझी मनापासूनची प्रार्थना.

## बॉलीवुड टाईम्स

### दिल चाहता हैं....

रो.सुबोध सराफ



‘ दिल चाहता है.... हम ना रहे कभी यारो के बिन. दिन दिन हो प्यारी बाते झुमे शामे गाये राते मस्ति में रहे डूबा डूबा हमेशा जहा हमको राहो में युही मिलती रहे खुशिया झिलमिलाते हो जगमगाते हो अपने रस्ते ये ख़ुशी रहे रौशनी रहे अपने वास्ते ओ ओ ओ ‘दिल चाहता है ’ अमीर खान, अक्षय खन्ना सैफ़ अली खान तिघे हि गोव्याच्या रस्त्याला लागले असतात आणि गोव्याला जाऊन काय धूम कारतात. हे सर्वश्रुत आहेच. फरहान अख्तर ने बरोब्बर ‘नस’ पकडली होती युवा वर्गाची. अक्षरशः डोक्यावर घेतले या सिनेमाला तरुणांनी आणि सर्वांनीच. सबकुछ बेह्तरिन .प्रीती झिंटा . सोनाली कुलकर्णी सुहसिनि मुळे (सैफ च्या आईचा रोल ) आणि ‘डिम्पल .’ विचारूच नका छोटासा रोल पण उत्तम साकारला आहे तिने. सर्वच जुळून आल होत या सिनेमात सगळ्यांची काम उत्कृष्ट संगित‘ शंकर एहसान लॉय ’ यांचे सर्व गाणी आजही ऐकावीशी वाटतात ‘ जिसे ढूंढता हु मै यही कही वो मिली मुझे यही कही. वो लड़की है कहा ’ हे गाणे ख़ासच या गाण्याचे चित्रीकरण ही जुन्या काळा प्रमाणे करण्यात आले होते. ‘कृष्ण धवल’ आणि डान्स स्टेप्स ही जुन्या पद्धातीच्याच होत्या. अलका याज्ञिक आणि अमीर चे ‘जाने क्यू लोग प्यार करते है’ श्रीनिवासने गायलेले ‘कैसी ही ये ऋत के जिस मे फुल बन के दिल खिले ’ हे उत्तम जमले आहे . शंकर के के शान ने गायलेले ‘कोई कहे केहता राहे कितना भी हम को दिवाना हम लोगो कि ठोकर मैं है या जमाना ’ या गाण्यात तिघांनी ही धूम केली आहे. सोनू निगम ने गायलेले ‘दिल के रस्तो मी ऐसी ठोकर मैने खायी तुटे ख्वाब सारे एक मायुसी ही छायी जिन्दगी खो गयी हर ख़ुशी खो गयी मैने जो प्यार किया उस की सजा ये पायी ‘तनहाई तनहाई ’ ही सर्व गाणी मोस्ट पॉप्युलर झालीत. सिनेमा स्टोरी दिग्दर्शन सर्वच जमून आले होते . या सिनेमाला ‘राष्ट्रीय पारितोषिक ही प्राप्त झाले’ फरहान अख्तर चा प्रवेश दिग्दर्शक म्हणून दणक्यात झाला य़ सर्वांच्या उत्कृष्ट कामगिरीने सुपर हिट ’ केलेला ‘दिल चाहता है ’.

## गोल्डन वर्डस्

### Book Review

रो.पंकज व्यवहारे



**Sam Walton: Made in America**

*Author: Sam Walton*

*Type: Non-fiction*

*Published in: 1992*

***Best Quotes in the book:*** *There is only one boss. The customer. And he can fire everybody in the company from the chairman on down, simply by spending his money somewhere else.*

***Review:*** Since it's a biography, the book begins with Sam's childhood and where he got his sense of entrepreneurship from initially. Sam then explains how he built out a chain of 16 stores (all but one under the Ben Franklin franchise), integrated family and business, started the first Walmart in 1962 (due to Ben Franklin franchise disapproving of his discount policy) and slowly grew the team, until eventually taking the company public in 1970 and using the money from the IPO to grow it further. He then explains various aspects of growing the company into the largest retailer of the world, including employee policy, his basic principles, and handing over the reigns. The book concludes with his idea of giving back and his 10 rules for building a successful business.

***About the Author:*** Samuel Moore Walton born on 29 March 1918 was an American businessman and entrepreneur best known for founding the retailers Walmart and Sam's Club. Wal-Mart Stores Inc. grew to be the world's largest corporation by revenue as well as the biggest private employer in the world.

# वाचन प्रेरणा दिन- रोटरी क्लब चा अभिनव उपक्रम...

रोटरी क्लब जळगावतर्फे भारत रत्न माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त अर्थात वाचन प्रेरणा दिनी जळगावात रोटरी महावाचन अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यात जळगावकरांनी १५ हजार मिनिटे वाचन केले. बुधवार दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत गणपती नगरातील भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम वाचन नगरीत (रोटरी हॉलचे या दिवसापुरते बदललेले नाव) या महावाचन अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

अभियानाचा मान्यवरांनी वाचन करून शुभारंभ केला. याप्रसंगी रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. चंद्रशेखर सिकची, प्रेम कोगटा, व. वा. जिल्हा वाचनालयाचे कार्याध्यक्ष सी.ए. अनिलकुमार शाह, गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, सहप्रांतपाल डॉ.अपर्णा भट – कासार, प्रोजेक्ट चेअरमन विजय जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनिलकुमार शाह यांनी बोलताना वाचन संस्कृतीला चालना देणारा आणि जळगावची ओळख वाचणारं गाव अशी करणारा हा उपक्रम आहे. दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन केले.

नूतन जिल्हाधिकारी श्री रोहन घुगे यांनी अभियानास प्रत्यक्ष भेट देऊन वाचन करीत सहभाग घेतला. या अभिनव उपक्रमाचे त्यांनी कौतुक करून त्यात सातत्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. रीडर स्पीक्स अर्थात वाचकांना लेखी व ऑडिओ – व्हिडिओ स्वरूपात प्रतिसाद नोंदवण्याची, अभिप्राय व्यक्त करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. वाचन अभियान सहभाग स्मृती म्हणून अनेकांनी सेल्फी पॉईंट वर फोटो काढले आणि रीडर्स वॉलवर स्वाक्षरी करून आनंद व्यक्त केला. कुटुंब सदस्यांसह सहभागी झालेल्या परिवारांचे वाचक कुटुंब म्हणून फोटो काढण्यात आले. वाचन सभागृहात विविध मान्यवर व्यक्तींचे सुविचार लावण्यात आले होते.

सायंकाळी रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील, लिटरसी कमिटी चेअरमन प्रा. डॉ. शुभदा कुलकर्णी, नॉन मेडिकल कमिटी चेअरमन संदीप शर्मा यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. आगामी वर्षात रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या सर्व रोटरी क्लबमध्ये हा उपक्रम राबविण्याचा मानस डॉ. राजेश पाटील यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष रो. गिरीश कुलकर्णी यांनी तर आभार मानद सचिव रो.सुभाष अमळनेरकर यांनी मानले. सूत्रसंचालन संवाद सचिव रो. पंकज व्यवहारे यांनी केले.






## यश, निवड, अभिनंदन

- रो.निलेश झोपे यांची भारतीय जनता पार्टी सहकार आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाली. अभिनंदन!
- रो.डॉ.महेश पाटील यांनी दि.६/१०/२०२५ रोजी रक्तदान केले. त्यांनी आजपयंत ३३ वेळा रक्तदान केले आहे. अभिनंदन !
- 'रोटरी सुपरस्टार' या आय.एफ.आर .एम. (IFRM) जळगाव आयोजित गीत गायन स्पर्धेत रो.किर्ती पाटील यांची नागपूर येथील अंतिम फेरीत गीत सादर करण्यासाठी निवड झाली. अभिनंदन!
- रो.परिक्षित भदादे (C.A.) यांनी नुकताच Artificial Inteligence (AICA.) हा अतिशय महत्त्वाचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना Institute of Chartered Accountants of India तर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## ... क्षणचित्रे ...










## श्रद्धांजली



रो.डॉ.शमा सराफ यांच्या मातोश्री आणि रो.सुबोध सराफ यांच्या सासूबाई प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.उषा जगताप यांचे दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्रदान करो. क्लब तर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.